**महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा-२०२३**

**महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी सेवा (गट-क) भाग-१ अंतिम निवडसूचीतील उमेदवारांना नामनिर्देशनाने तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत.(मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार)**

# नगरपरिषद प्रशासन संचालनालय

बेलापूर भवन, ७ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर रेल्वे स्टेशन जवळ (पु), नवी मुंबई - ४०० ६१४.

नपप्रसं/कक्ष-३/संवर्ग पदभरती-२०२३/नि.आ./कर/7582

दिनांक : ऑक्टोबर, २०२५

09 OCT 2025

**वाचा :-**

१. महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ अंतर्गत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गरपरिषद कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी सेवा (गट-क) संवर्गासाठीची दि. १९ सप्टेंबर, २०२४ व दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली भाग-१ अंतिम निवडसूची व भाग-२ अतिरिक्त अंतिम निवडसूची (प्रतिक्षायादी).

२. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे पत्र क्र. नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/प्र.क्र. ०१/ २०२४/५६१७ दि. १२ सप्टेंबर, २०२४.

३. जिल्हाधिकारी धुळे यांचा अहवाल क्र. नवि-शा/सामान्य-१/कावि/११४७/२०२४ दि. २२ ऑक्टोबर, २०२४.

४. संचालनालयाचे पत्र क्र. नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/प्र.क्र. ०१/२०२४/८३५४ दि. ०२ डिसेंबर, २०२४.

५. जिल्हाधिकारी धुळे यांचे पत्र क्र. नवि-शा/सामान्य-१/कावि/६५/२०२५ दि. १७ जानेवारी, २०२५.

६. संचालनालयाचे पत्र क्र.नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/प्र.क्र. ०१/२०२४/२२६८ दि.०७ मार्च २०२५.

७. जिल्हाधिकारी धुळे यांचे पत्र क्र. नवि-शा/सामान्य-१/कावि/ ७६१/२०२५ दि. २६ ऑगस्ट, २०२५.

८. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, औरंगाबाद यांचेकडील आदेश दि. ०६ ऑगस्ट, २०२५

## -: आदेश :-

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ करीता दि. ११ जुलै, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून उमेदवारांची दि. २५ ऑक्टोबर, २०२३, २५ ऑक्टोबर, २०२३ व २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेत उमेदवारांना संवर्गनिहाय प्राप्त झालेले गुण नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. दि. १० जून, २०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप निवडसूचीतील कागदपत्र पडताळणीअंती पात्र

ठरलेल्या उमेदवारांची अंतिम निवडसूची दि. १९ सप्टेंबर, २०२४ व दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

संचालनालयाचे आदेश क्र. नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती-२०२३/नि.आ./कर/६४२३, १८६०, १८६१, ५४६, ५९५५, ६६१५ व ६८१० दि. ११ ऑक्टोबर, २०२४, दि. २५ फेब्रुवारी, २०२५, १६ जुलै, २०२५, ११ ऑगस्ट, २०२५, ११ सप्टेंबर, २०२५ व १७ सप्टेंबर, २०२५ नुसार महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी सेवा संवर्गाच्या निवडसूचीत समाविष्ट पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले होते.

उपरोक्त वाचा क्र. २ च्या पत्रान्वये महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ च्या अनुषंगाने कर निर्धारण व प्रशासकीय सेवा गट-क परीक्षेतील उमेदवार श्रीम. पुजा खुशालसिंग गुमलाडु व श्रीम. आकांक्षा संतोष बिघोत या दोन्ही उमेदवारांबाबत तक्रार प्राप्त झाल्याने जिल्हाधिकारी धुळे यांनी आपल्या स्तरावर सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन संचालनालयास अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

जिल्हाधिकारी धुळे यांनी चौकशी अहवाल सादर केलेला होता, त्यानुसार उमेदवार, तक्रारदार, टिसीएस कंपनीचे प्रतिनिधी यांनी चौकशी दरम्यान अतिशय मोघम स्वरुपाची उत्तरे दिली असल्याने व उपरोक्त प्रकरण हे (Software Related) तांत्रिक स्वरुपाचे असल्याने प्रकरणी सखोल चौकशी पोलीस यंत्रणेमार्फत व्हावी अशी शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार सदर प्रकरणाची पोलीस यंत्रणेमार्फत चौकशी करण्याबाबत संदर्भ क्र. ६ नुसार मा. जिल्हाधिकारी, धुळे यांना कळविले होते.

तसेच श्रीम. पुजा खुशालसिंग गुमलाडु मुळ अर्ज क्र. ११९०/२०२४ व श्रीम. आकांक्षा संतोष बिघोत मुळ अर्ज क्र. ११९१/२०२४ नुसार त्यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती.

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, औरंगाबाद यांचेकडील दि. ०६ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या आदेशानुसार सोबतच्या परिशिष्टातील उमेदवारांना नियुक्ती देण्यात येत आहे.

**सोबतच्या परिशिष्टात नमूद उमेदवाराची "महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी सेवा, गट-क अंतर्गत कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी या पदावर संबंधीत श्रेणी व वेतनस्तरात ते ज्या दिवशी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील त्या दिनांकापासून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये नगरपरिषदा/नगरपंचायती मधील रिक्त पदी दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी विहित अटी व शर्तींच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात येत आहे.**

**अटी व शर्ती पुढील प्रमाणे :-**

१. उनेदवारांनी आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत रुजू होवून, संबंधित मुख्याधिकारी यांचे मार्फत विहीत करण्यात आलेल्या नमुन्यातील आपला रुजू अहवाल संबंधित जिल्हा सहआयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, यांचेकडे सादर करावा. रुजू अहवालाचा नमुना सोबत जोडला आहे.

२. **जात वैधता प्रमाणपत्र तपासणी :-** ज्या उमेदवारांची निवड ही आरक्षित सामाजिक प्रवर्गाच्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्गाच्या पदावर झालेली आहे व ज्यांनी कागदपत्र पडताळणीच्यावेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा उमेदवारांची नेमणूक ही जात वैधता प्रमाणपत्र तपासणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपाची असेल.

११.नवनियुक्त उमेदवारांच्या सेवा या महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती औद्योगिक नगरे राज्यसेवा (नियुक्ती, समावेशन व सेवेच्या शर्ती) नियम, २००६ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा यास अधीन राहून विनियमित करण्यात येतील.

१२.सदर नियुक्ती उमेदवारांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यासत्यतेवर अवलंबून राहील. उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे तसेच सांक्षाकन नमुन्यात नमूद केलेली माहिती, नियुक्तीनंतर खोटी अथवा बनावट आढळल्यास, सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१३.नवनियुक्त उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची (प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, पदवीधर अंशकालीन खेळाडू, दिव्यांग व अनाथ या समांतर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित प्रमाणपत्रे तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र ) संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या सक्षम प्राधिकारी यांचेकडे पडताळणीकरीता पाठविण्यात आलेले असून पडताळणीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. सदर पडताळणी अंती सादर केलेली प्रमाणपत्रे खोटी आढळून आल्यास आपली सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

१४.नवनियुक्त उमेदवार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरे राज्यसेवा (समावेशन, नेमणुका व सेवेच्या शर्ती) नियम, २००६ मधील तरतूदीप्रमाणे तसेच नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत सर्व प्रचलित शासन निर्णयामधील तरतूदीनुसार महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्गात मूळ नेमणूकीसाठी पात्र नव्हता अथवा विहित अर्हता प्राप्त नव्हता अथवा त्याने नेमणूक मिळविण्यासाठी खोटी माहिती दिली होती अथवा खोटे प्रमाणपत्र सादर केले होते अशा कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. १२ ऑक्टोबर, १९९३ मधील तरतूदीनुसार सेवेतून बडतर्फ करण्यात येईल.

१५.उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत मत्ता व दायित्व बाबतचे विवरणपत्र विहित नमुन्यात संबंधित मुख्याधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

१६.नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणताही प्रवासभत्ता व पदग्रहण कालावधी मंजूर केला जाणार नाही.

१७.पूर्वी शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारांची सरळसेवेने/नामनिर्देशनाने शासनाच्या दुसऱ्या पदावर परिवीक्षाधीन उमेदवार म्हणून नियुक्ती झाली असल्यास अशा उमेदवारांची सदर पदावरील वेतननिश्चिती ही वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन १२८९/प्र.क्र.२/९०/सेवा-३, दि. २३ मार्च, १९९४ मधील तरतूदीनुसार करण्यात येईल.

१८.पूर्वी शासकीय सेवेत नसणाऱ्या उमेदवारांची सरळसेवेने/नामनिर्देशनाने परिवीक्षाधीन उमेदवार म्हणून नियुक्ती झाली असल्यास अशा उमेदवारांची सदर पदावरील वेतननिश्चिती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतूदीनुसार करण्यात येईल.

१९.नगर विकास विभागाकडील शासन निर्णय दि. १२ जुलै, २०२३ अन्वये नवनियुक्त उमेदवारांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:अनिओ-२०१५/NPS/प्र.३२/सेवा-४, दि. ०६ एप्रिल, २०१५ अन्वये विहीत केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना योग्य त्या फेरफारासह लागू राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तिवेतन योजना, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

२०.तथापि, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४, दि. १८ ऑगस्ट, २००९ मधील तरतुदीनुसार दि. ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दि. ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल आणि त्याचा दि. ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नविन पदावर नियुक्त करण्यात आले असेल तर अशा प्रकरणी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अंनियो-१००६/८७/सेवा-४ दि. १२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांस महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील.

२१.जे उमेदवार यापूर्वी अन्य विभागात शासकीय सेवेत कार्यरत होते त्यांच्या बाबतीत ते ज्या विभागात कार्यरत होते त्या विभागाकडून त्यांच्या विरुध्द कोणती विभागीय चौकशी सुरु होती किंवा प्रस्तावित आहे याबाबतची माहिती प्राप्त करुन घेण्याच्या अधिन राहून त्यांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. जर एखाद्या उमेदवारा विरुध्द त्यांनी यापूर्वी कार्यरत असलेल्या विभागात विभागीय चौकशी सुरु असल्यास सदर नियुक्तीनंतरही सदर चौकशी सुरु राहील.

२२.सेवा पुस्तक उघडणे व प्राथमिक नोंदी घेणे :- संचालनालयाकडील दि. १७/१०/२०१८ चे अधिकार विकेंद्रीकरण परिपत्रकानुसार नवनियुक्त उमेदवारांचे सेवा पुस्तक उघडणे आणि त्यात प्राथमिक नोंदी घेणेसाठी संबंधीत जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

२३.नवनियुक्त उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक पात्रता, जन्मतारीख, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, समांतर आरक्षण इ. बाबतची मूळ प्रमाणपत्रे तथा त्यांच्या सांक्षांकित प्रती पदावर रुजू झाल्यापासून सात दिवसाच्या आत संबंधित जिल्हा सह आयुक्त यांच्याकडे उपलब्ध करुन द्याव्यात. जिल्हा सह आयुक्त यांनी संबंधीत कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक उघडून त्यात आवश्यक नोंदी घेवून सेवा पुस्तक संबंधीत नगरपरिषद / नगरपंचायतीकडे पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरीत करावे.

२४.मराठी व हिंदी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट :- जे नवनियुक्त उमेदवार संबंधीत नियमानुसार मराठी व हिंदी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्यास पात्र असतील अशा उमेदवाराच्या बाबत संबंधीत जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय यांनी आदेश पारीत करुन त्याची नोंद सेवा पुस्तकात घ्यावी.

२५.सदर उमेदवारांपैकी जे उमेदवार मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण झाला नसेल किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर संबंधीत नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२६.पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम :- राज्य प्रशिक्षण धोरणाअंतर्गत या संचालनालयाकडून आयोजित करण्यात येणारे पायाभूत प्रशिक्षण नियुक्त कर्मचारी यांना पूर्ण करणे बंधनकारक आहे.

२७.विभागीय परीक्षा :- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे राज्यसेवा (समावेशन, नेमणुका व सेवेच्या शर्ती) नियम, २००६ मधील नियम २२ अन्वये तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. ०१ मार्च, २०१८ व ३१ मार्च, २०२१ नुसार नवनियुक्त उमेदवाराने या संचालनालयाने विहित केलेली विभागीय परीक्षा तीन संधीमध्ये उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. तीन संधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

अशा उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे / पुरावे नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाल्यापासून १० दिवसात संबंधित मुख्याधिकारी यांचेकडे सादर करावीत.

मुख्याधिकारी यांना जात वैधता प्रमाणपत्र तपासणीचा प्रस्ताव संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. मुख्याधिकारी यांनी उमेदवाराकडून आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यापासून १० दिवसात उमेदवाराचे जात प्रमाणपत्र ज्या जिल्ह्यातून निर्गमित केले आहे त्या जिल्ह्याच्या जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा. अनुसुचित जमाती बाबतीत ज्या विभागातील दाखला असेल त्या विभागातील विभागीय/जिल्हा समितीकडे प्रस्ताव सादर करावा. याशिवाय नियुक्ती प्राप्त उमेदवाराने देखील स्वतंत्रपणे जात पडताळणी समितीकडे त्याच्याकडे असलेले कागदपत्रे / पुरावे सादर करुन पाठपुरावा करावा.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दि. १२ डिसेंबर, २०११ नुसार विहीत मुदतीत म्हणजे सहा महिन्याच्या आत जात पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र वैधता प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल आणि अशा उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन अधिनियम, २००० मधील तरतूदीनुसार सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३. **चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणी :-** सदरची नियुक्ती ही उमेदवारांच्या चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत असून सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २८ ऑगस्ट, २०१७ सोबतच्या साक्षांकन नमुन्यात माहिती भरुन रुजू अहवालासोबत संबंधित मुख्याधिकारी यांचेकडे सादर करावा. मुख्याधिकारी यांनी प्राप्त साक्षांकन नमुना संबंधित पोलीस स्टेशनकडे पाठवून चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणी करुन घ्यावी.

उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य असल्याचे आढळून आल्यास तात्पुरते नियुक्तीपत्र रद्दबादल करुन भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

संबंधित पोलीस स्टेशनकडून चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणीनुसार उमेदवाराच्या चारित्र्यासंदर्भात कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आल्यास संबंधीत उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल.

४. **वैद्यकिय तपासणी :-** सदरची नियुक्ती ही उमेदवाराच्या वैद्यकीय पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत असून संबंधित मुख्याधिकारी यांनी उमेदवार रुजू झाल्यानंतर १० दिवसात उमेदवारास जिल्हा शल्य चिकीत्सकाकडून शासन सेवेत नियुक्त करण्यात आलेल्या पदावर काम करण्यास पात्र असल्याबाबत तात्काळ वैद्यकीय तपासणी करुन घेण्यासाठी पत्र द्यावे. उमेदवाराने तात्काळ वैद्यकीय तपासणी करुन घेवून, एक महिन्याच्या कालावधीत वैद्यकीय प्रमाणपत्र संबंधीत मुख्याधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवार वैद्यकीय तपासणीत अपात्र आढळल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

५. **प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / पदवीधर अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाच्या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्र सादर करणे :-** प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन या समांतर आरक्षणाच्या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होताना त्यांचा प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन उमेदवार असल्याचा मूळ दाखला आपल्या रुजू अहवालासोबत संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. त्यांनी मूळ दाखला सादर केल्यानंतरच मुख्याधिकारी यांनी संबंधित उमेदवारास नियुक्ती दिलेल्या पदावर रुजू करुन घ्यावे. सदर दाखला (मूळ प्रत) रुजू अहवालासह संचालनालयाकडे ७ दिवसात खास दूताद्वारे सादर करावयाची जबाबदारी संबंधीत मुख्याधिकारी यांची राहील.

६. नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होताना उमेदवाराने स्वत:चे फोटो असणारे वैध ओळखपत्रासह (पॅनकार्ड/आधार कार्ड / बँक पासबुक इ). मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला / अधिवास प्रमाणपत्र / जातीचे प्रमाणपत्र / वैधता प्रमाणपत्र / नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र / आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रमाणपत्र मुख्याधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील.

७. जे उमेदवार सध्या केंद्र/राज्य शासनाच्या सेवेत अथवा निमशासकीय/नगरपरिषद/नगरपंचायत सेवेत कार्यरत असतील तर संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांना नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्याच्या दृष्टीने सदर सेवेतून कार्यमुक्त झाल्याचे लेखी पत्र सादर केल्याशिवाय त्यांना रुजू करुन घेतले जाणार नाही.

८. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. ०२ सप्टेंबर, १९८३ नुसार माजी सैनिक वर्गवारीचा दावा केलेल्या उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या माजी सैनिक वर्गवारीच्या दावा तपासणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

९. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही - २००४/प्र.क्र.१७/२०००/१२, दि. ०१ जुलै, २००५ नुसार नमुना - अ मध्ये उमेदवारास लहान कुटुंबासंबधीचे प्रतिज्ञापन भरुन द्यावे लागेल. दि. २८ मार्च, २००५ रोजी व त्यानंतर दोन पेक्षा अधिक अपत्य असल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवारास शासकीय सेवेकरीता अपात्र ठरविण्यात येऊन सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१०. नेमणूकीच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत हजर व्हावे लागेल. एखाद्या उमेदवारास विहित कालावधीत अपरिहार्य, उचित कारणास्तव रुजू होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास त्या उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसाच्या आत या संचालनालयास मुदतवाढीचा अर्ज सादर करावा. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. उचित कारणास्तव विहित कालावधीत मुदतवाढीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना मुदतवाढ देण्याचा/नाकारण्याचा अंतिम निर्णय आयुक्त तथा संचालक यांचा राहील.

जे उमेदवार हा आदेश निर्गमित झालेल्या तारखेपासून एक महिन्याच्या मुदतीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत अथवा त्यांचेकडून या संबंधात काही सूचना प्राप्त झाली नाही तर ही नियुक्ती त्यांना स्वीकृत नाही असे समजून उमेदवारांचे नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील.

मुदतवाढीसंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१८/व्ही.आय.पी.६७/कार्या.१२, दि. २८ मे, २०१८ व दि. २६ सप्टेंबर, २०१८ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

२८.नवनियुक्त उमेदवारांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. परिवी २७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८ दि. २२ जून, २०२१ नुसार नवीन परिवीक्षा धोरण लागू राहील. परिवीक्षा कालावधीत उमेदवार शासकीय कामकाज करण्यास सक्षम नसल्याचे सिध्द झाल्यास संबंधित उमेदवाराची शासकीय सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

२९.नवनियुक्त उमेदवारांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. परिवी २७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८ दि. २२ जून, २०२१ मध्ये नमूद केल्यानुसार परिवीक्षा कालावधीत रजेच्या तरतूदी लागू होतील. तसेच परिवीक्षा कालावधीमध्ये कोणतीही वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

३०.सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २१ जून, २०२१ च्या शासन अधिसूचनेअन्वये विनियमित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील तरतुदीनुसार सदरहू उमेदवारांची सेवाजेष्ठता त्यांच्या रुजू झालेल्या दिनांकापासून निश्चित करण्यात येईल.

३१.दि. ११ ऑक्टोबर, २०२४, ०९ जानेवारी, २०२५, दि. २५ फेब्रुवारी, २०२५, दि. १६ जुलै, २०२५, दि. ११ ऑगस्ट, २०२५, दि. ११ सप्टेंबर, २०२५ व दि. १७ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या नियुक्ती आदेशातील उमेदवारांचा जेष्ठतेचा मानीव दिनांक या आदेशातील उमेदवारांना लागू राहणार नाही.

३२.संबंधित उमेदवार हा राज्यातील कोणत्याही नगरपरिषद किंवा नगरपंचायतीमध्ये बदलीस पात्र राहील

३३.महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ व नगर विकास विभाग, शासन निर्णय दि. ११ मे, २०१७ आणि सामान्य प्रशासन विभागाने बदल्यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदी नवनियुक्त उमेदवारांच्या बदल्यांकरीता लागू राहतील.

३४.उमेदवार सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा देऊ इच्छित असल्यास, त्याला सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही १०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि. ०२ डिसेंबर, १९९७ मधील तरतूदीनुसार संचालनालयास किमान १ (एक) महिन्याची आगाऊ नोटीस किंवा एक महिन्याचे मूळ वेतन देणे आवश्यक राहील. यासंदर्भातील राजीनामा स्विकारण्याचे अधिकार केवळ या संचालनालयास असतील. मुख्याधिकारी / जिल्हा सहआयुक्त / विभागीय सह आयुक्त यांनी परस्पर राजीनामा स्विकृत करु नये किंवा मंजूर करु नये. तथापि, राजीनामा दिल्यानंतर पुन्हा राजीनामा मागे घ्यावयाचा असल्यास, त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो २०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४ दि. ०९ मे, २०२२ मधील तरतूदी लागू राहतील.

३५.मात्र गैरशिस्त, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणांसाठी एखाद्या उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी नोटीस देण्याचे बंधन या संचालनालयावर असणार नाही.

३६.उमेदवारांच्या सेवानिवृत्तीचे वय प्रचलित नियमानुसार राहील.

३७.आपण विहित वेळेत हजर न झाल्याने विना काम विना वेतन (No Work No Pay) या प्रशासकी क:यद्याच्या मुलभूत सिध्दांतानुसार आपणास मागील कालावधीतील वेतन, भत्ते, सेवाजेष्ठता व इतर लाभ पूर्वलक्षी प्रभावाने अनुज्ञेय असणार नाहीत.

३८.नियुक्ती देण्यात येत असलेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या / पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता विशिष्ट ठिकाणी नियुक्ती / पदस्थापना मिळविण्यासाठी मा. लोकप्रतिनिधी / खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचे मार्फत दडपण / दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित उमेदवारांविरुध्द

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

३९. सदरचे नियुक्ती आदेश माननीय उच्च न्यायालय / मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण यांचेकडे याबाबत प्रलंबित असलेल्या याचिका / मूळ अर्ज यांचे निर्णयाच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

४०. मा. न्यायालयीन आदेशामुळे अथवा काही तांत्रिक कारणामुळे अंतिम निवडसूचीमध्ये भविष्यात फेरबदल झाल्यास व उमेदवाराची निवड त्यामुळे रद्द करावी लागल्यास उमेदवारास त्याबाबत कोठेही दावा सांगता येणार नाही. त्यांना कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता नोकरीवरुन कमी करण्यात येईल.

४१. सदरचे नियुक्ती आदेश मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, औरंगाबाद खंडपीठ मुळ अर्ज क्र. ११९०/२०२४ व मुळ अर्ज क्र. ११९१/२०२४ मधील निर्णय तसेच सदर पदभरतीच्या अनुषंगाने भविष्यात दाखल होणाऱ्या याचिका / मूळ अर्ज यांचे अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

४२. "उपरोक्त आदेशामधील सर्व अटीचे मी काळजीपूर्वक वाचन केले आहे व आदेशातील सर्व अटी मला मान्य आहेत", अशा प्रकारचे बंधपत्र संबंधीत उमेदवारास पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यापूर्वी १००/- रुपयाच्या स्टँम्पवर सादर करणे आवश्यक आहे व त्यानंतरच त्याला सेवेत रुजू होता येईल.

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
**आयुक्त तथा संचालक,**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई**

प्रत : संबंधित उमेदवार (ई-मेल व वेब पोर्टलद्वारे)

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

१. मा. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. मा. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, (सर्व विभाग)
३. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, (सर्व)

प्रत कार्यवाहीसाठी

१. सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व विभाग
२. सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व), यांना सूचित करण्यात येते की, आपल्या जिल्ह्यात पदस्थापना देण्यात आलेले सर्व उमेदवार रुजू झालेबाबत संबंधित मुख्याधिकारी यांचेकडून आढावा घेवून त्याचा दैनिक अहवाल संचालनालयास सादर करावा.
३. मुख्याधिकारी नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
**आयुक्त तथा संचालक,**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई**

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा-२०२३

## महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी, (गट-क)

संचालनालयाचे आदेश क्र. नपप्रसं/कक्ष-३/संवर्ग पदभरती-२०२३/नि.आ./कर/7582 दि. ऑक्टोबर, २०२५ सोबतचे

09 OCT 2025

### परिशिष्ट - अ

पदनाम :- कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी (गट-क) "श्रेणी - अ"

वेतनस्तर :- एस - १५ : ४१८०० - १३२३०० (सातव्या वेतन आयोगानुसार)

| Sr No. | Candidate Name | Gender | Original Category | Selection Category | | Place of Appointment Municipal Council / Nagar Panchayat | District |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AKANSHA SANTOSH BIGHOT | Female | De-Notified Tribe A (VJ - A) | VJ-A-LDS | 1 | MAJALGAON | BEED |

आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

O/C
JTP

## महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा-२०२३

## महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी, (गट-क)

संचालनालयाचे आदेश क्र. नपप्रसं/कक्ष-३/संवर्ग पदभरती-२०२३/नि.आ./कर/7582 दि. 09 OCT 2025 ऑक्टोबर, २०२५ सोबतचे

### परिशिष्ट – ब

पदनाम :- कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी (गट-क) "श्रेणी – ब"

वेतनस्तर :- एस – १४ : ३८६०० – १२२८०० (सातव्या वेतन आयोगानुसार)

| Sr No. | Candidate Name | Gender | Original Category | Selection Category | | Place of Appointment Municipal Council / Nagar Panchayat | District |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | POOJA KHUSHALSING GUMLADU | Female | De-Notified Tribe A (VJ - A) | OPEN-LDS | 1 | DHARASHIV | DHARASHIV |

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

O/C